माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ७८/२०२२**

**अपिलार्थी, श्री. डाकराम रा. फेंडर**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
गट ग्रामपंचायत वडेगाव (मांढळ), ता. कुही, जि. नागपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,**
पंचायत समिती कुही, ता. कुही, जि. नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १२.०२.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १६.११.२०२१ | २४.११.२०२१ | ०७.१२.२०२१ | २०.१२.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक १६.११.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " ग्रामपंचायतकडे खर्चाबाबत किती फंड आहेत त्या फंडाबाबत माहिती व त्यापैकी अनुक्रमे १) सामान्य फंड २) पाणी पुरवठा फंड ३) ग्राम स्वराज्य फंड, या तिन्ही फंडाअंतर्गत माहे एप्रिल २०२१ ते माहे इंदु राठोड मॅडम (सचिव) रिलीव्ह (बदली) होईपर्यंत झालेल्या खर्चाची माहिती मिळण्याकरीता रोख पुस्तीकेच्या सत्यप्रतिलिपी व त्या संबंधात व्हाऊचरच्या सत्यप्रतिलिपी मिळण्यात यावी " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २४.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, आपण मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची आहे. प्रत्येक विषयाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावा. करीता आपले अर्जानुसार आपणास माहिती देता येत नाही, असे अपिलार्थीस कळविले आहे. तद्नंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०७.१२.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे “माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे म्हणून नकार दिल्यामुळे ” असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २०.१२.२०२१ रोजी सुनावणी घेवून, अपीलकर्त्याचे अपील मान्य करीत सचिव तथा जन माहिती अधिकारी, ग्रामपंचायत वडेगांव (मांढळ) यांनी ग्रामपंचायत सामान्य फंड व पाणी पुरवठा फंड याबाबत माहिती अपिलार्थी यांना दिनांक ३०.१२.२०२१ पर्यंत उपलब्ध करुन द्यावी, असे आदेशित केले आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०३.०१.२०२२ रोजी** " प्रपत्र-अ नुसार माहिती नाकारणे, प्रथम अपील निर्णय झाल्यानंतरही माहिती न दिल्यामुळे " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक १०.०१.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक १२.०२.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, श्रीमती वनमाला पाटील व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), श्री. एस.बी. ढेंगे उपस्थित आहेत. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, श्रीमती इंदू राठोड उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २०.१२.२०२१ रोजीच्या आदेशानुसार वरील माहिती ही दिनांक ३०.१२.२०२१ रोजी पर्यंत अपिलार्थीस पुरविणे अपेक्षित होते. ती अपिलार्थी यांना दिनांक ०३.०१.२०२२ रोजी पुरविण्यात आलेली असून मुद्दा क्र. ३ म्हणजेच स्वराज्य फंड ग्रामपंचायतला उपलब्ध नसल्यामुळे माहिती निरंक असल्याचे अपिलार्थीस सुचीत केले आहे. यातील सामान्य फंड व पाणी पुरवठा फंड रोखपुस्तिका व व्हाऊचरच्या सत्यप्रती अपिलार्थी यांना प्रदान करण्यात आली असल्याचे सादर केलेल्या खुलाश्यात नमूद केले आहे. मात्र अपिलार्थी यांनी व्दितीय अपील अर्जात व आज केलेल्या मौखिक युक्तीवादात परिपूर्ण माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे. दिलेली माहिती ही अपूर्ण असल्याचा अपिलार्थी यांचा दावा लक्षात घेता, विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रत्यक्षात उपलब्ध असलेली माहिती व अपिलार्थी यांना प्रदान करण्यात आलेली माहिती याचा तपशिल तपासणी करुन अपिलार्थी यांना माहिती दिली गेलेली नसल्यास उर्वरित माहिती अपिलार्थीस तात्काळ व विनामुल्य प्रदान करण्यात यावी, या निर्देशासह प्रस्तूत व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

**उपरोक्त आदेशानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १२.०२.२०२४**

जावक क्रमांक 5022 दिनांक 14 AUG 2024